# नि.फौ.ख.क्र.२३/२०१६ मधील निशाणी क्र.१ खाली आदेश

## (पारीत दिनांक १२ मार्च, २०२५)

१. प्रकरणातील कागदपत्रांचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, सदरचे दोषारोपपत्र हे दि.०१.०२.२०१६ रोजी दाखल करण्यात आले असुन दि.०१.०७.२०१७ रोजी आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान कलम ४२०, ४०५, ४०६, ४६४, ४६५, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दोषारोप निश्चित करण्यात आले. तदनंतर सदर प्रकरणात शेवटचा साक्षीदार क्र.३ ची साक्ष दि.१२.१०.२०२३ रोजी नोंदविल्यानंतर सदर दिवशी निशाणी ७८ वर अभियोग पक्षाने तपासी अधिकारी यांना समन्स काढण्याबाबत अर्ज दिला. सदरचा अर्ज मंजुर करण्यात आला. त्यानंतर दि.०९.११.२०२३ रोजी अभियोग पक्ष तपासी अधिकारी मंगेश पुनाजी विरनक यांना साक्षीकामी हजर करु शकले नाही. त्यामुळे त्यांचेविरुध्द जामिनपात्र वॉरंट जारी करण्यात आले. तरीही सदर साक्षीदार दि.१४/११/२०२४ पर्यंत हजर राहीले नाहीत. त्यामुळे अभीयोग पक्षास शेवटची संधी देवुन पुढील तारखेस सदर साक्षीदारास गैरहजर राहिल्यास अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्याचा निशाणी १ वर आदेश पारीत करण्यात आला.

२. सदर प्रकरण हे ९ वर्ष जुने असुनही प्रकरणात अभियोग पक्षातर्फे कार्यवाही केली जात नाही. आजरोजी आरोपी क्र.१तर्फे गैरहजेरीमाफीचा अर्ज मंजुर आणि आरोपी क्र.१ तर्फे वकील हजर. एकंदरीत सदर प्रकरणात अभियोग पक्षास संधी देवुनही त्यांनी सदर साक्षीदारांना हजर ठेवले नाही. करीता, अभियोग पक्षाचा पुरावा बंद करण्यात येतो. आरोपींविरुध्द अभीलेखावर पुरावा आल्याने प्रकरण आरोपींचे फौ.प्र.सं. ३१३ चे निवेदनकामी नेमण्यात येते.

SHAILENDRA NANDKISHOR PATIL

Digitally signed by SHAILENDRA NANDKISHOR PATIL
Date: 2025.03.12 17:26:56 +0530

(एस.एन. पाटील)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी,
न्यायालय क्र.३, दौंड, जि. पुणे

दौंड.
दि.१२/०३/२०२५

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word for word as per original judgment"

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | : | M.M. Chintale |
| Court name | : | Shri. S.N. Patil<br>Judicial Magistrate F.C., Daund<br>Tq. Daund, Dist. Pune |
| Order date | : | 12.03.2025 |
| Judgment signed by Presiding Officer on | : | 12.03.2025 |
| Judgment uploaded on | : | 13.03.2025 |